## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २३८वी बैठक

**दिनांक** : ०४ मे, २०१३ (शनिवार)

**वेळ** : सकाळी १०.०० वाजता

**स्थळ** : मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,
(१४७ मुख्य), पहिला मजला
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.जयन्त कुमार बाँठीया<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.ना.वि.मिराणी | - | सदस्य |
| श्री.मनुकुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री.मोहन अडतानी<br>अति. महापालिका आयुक्त<br>(महापालिका आयुक्त यांचे प्रतिनिधी म्हणून)<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.संजय भाटिया<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त<br>मुं.म.प्र.वि.प्रा. | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. श्रीकांत सिंह
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग व
प्रधान सचिव (विशेष प्रकल्प) (अति.कार्यभार)
सामान्य प्रशासन विभाग

श्रीमती वल्सा नायर सिंह
सचिव,
पर्यावरण विभाग,

श्री. श्यामसुंदर पाटील
महापालिका आयुक्त,
(अति.कार्यभार),
ठाणे महानगरपालिका

श्रीमती अश्विनी भिडे
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. सुनिल पिंपळखुटे
वित्त सल्लागार, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अडुसुमली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संपतकुमार
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.वि.ग.पाटील
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श.म.सबनीस
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.स.भ.तामसेकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.दिलीप कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. उ. गं. भार्गव
सचिव, कार्यकारी समिती, (अति.कार्यभार)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..३/-

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या २३७व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या २३७व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीच्या दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या २३७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालावर चर्चा करताना खालील विषयावर चर्चा करण्यात आली :-

पटल बाब क्र.३ : मुंबई महानगर प्रदेशासाठी फ्लंडर्स इन्व्हेस्टमेंट अँन्ड ट्रेड कंपनी यांचेव्दारे सर्वंकष (किंवा सर्व समावेशक) वाहतूक उन्नती/प्रणाली खालील प्रकल्पांचा सुसाध्यता अभ्यास.

कार्यकारी समितीच्या २३७ व्या बैठकीत मंजूर झालेल्या पटल बाब क्र.३ च्या कार्यवृतावरील कार्यवाही अहवालावर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, बेल्जियम राष्ट्राच्या दुतावासाने मुंबईमध्ये फ्लॅडर्स सरकार, बेल्जियम यांचा कराररनामा सादर केला आहे. मुंबईमधील पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी व गतिशिलता आणण्याकरिता सुसाध्यता अभ्यासासाठी अर्थसहाय्य मिळण्याकरीता फ्लॅडर्स सरकारचे प्रतिनिधीत्व करण्या-या फ्लंडर्स इन्व्हेस्टमेंट अँन्ड ट्रेड कंपनी यांनी सदर करारनामा तयार केला. सर्व एकत्रित आधारभूत संरचना यासह अर्थशास्त्रीय, तांत्रिक, पर्यावरण, सामाजिक व आर्थिक स्वरुप याबाबी दृष्टीस ठेवून भुदृष्य व नागरी जागा यावर आधारित सकल दृष्टीकोन ठेवून एन. पी. ब्रिजिंग ही फ्लेमिश

कंपनी सदर सुसाध्यता अभ्यास करणार आहे. सुसाध्यता अभ्यास हा सकल गतीशिलता मार्ग (सर्वकष वाहतूक प्रणाली) आणि त्यासंबंधी भविष्यात होणारा विकास व शहरांचे विस्तारीकरण (ग्रोथ सेंटर आणि मल्टी मोडल कॉरिडोर) यावरील आहे.

सदर सुसाध्यता अभ्यासासाठी अंदाजित १० लाख युरो इतका खर्च येणार आहे त्यापैकी फ्लेमिश सरकार ५०% म्हणजेच ५ लाख युरो (अंदाजित रु.३.५० कोटी) अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणार आहे. फ्लंडर्स इन्व्हेस्टमेंट अँन्ड ट्रेड कंपनीने ५० : ५० हिश्यांच्या आधारावर बृहत आराखडा तयार करण्याचे निश्चित केलेले असून फ्लेमिश सरकारकडून अर्थसहाय्याच्या स्वरुपात ५ लाख युरो मंजूर केले असून उर्वरित ५०% रक्कम म्हणजे ५ लाख युरो प्राधिकरणामार्फत उपलब्ध करुन देण्यात येतील.

त्यानुसार मुंबई महानगर प्रदेशात सर्वंकष वाहतूक प्रणाली अंतर्गत काही प्रकल्पांचा सुसाध्यता अभ्यास करण्याच्या दृष्टीने फ्लंडर्स इन्व्हेस्टमेंट अँन्ड ट्रेड कंपनी यांना ५० : ५० टक्के खर्चाच्या हिश्यानुसार काम देण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या संदर्भात महानगर आयुक्त यांनी आणखी असे स्पष्ट केले की, फ्लेमिश सरकारने आता पाच सल्लागारांच्या नावाची शिफारस केली असुन त्यापैकी प्राधिकरणाला एका सल्लागाराची निवड करावयाची आहे. कार्यकारी समितीने सदर प्रस्तावावर चर्चा केल्यानंतर करारनामा करण्यास संमती दर्शविली.

प्रत्येक स्वतंत्र प्रकल्पासाठी आवश्यक असणारे सविस्तर प्रस्ताव कार्यकारी समितीसमोर लवकरच सादर करण्याची आवश्यकता आहे यासंदर्भात महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, निवड केलेल्या सल्लागारांकडून जास्त दर नमुद करण्याची शक्यता आहे आणि करार केल्यानंतर त्यामधून माघार घेणे कठीण होऊ शकते. त्यामुळे सदर प्रस्तावाचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे.

कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे मत व्यक्त केले की, समाजहितासाठी जिथे जिथे आवश्यक असेल त्याठिकाणी आंतरराष्ट्रीय तंज्ञाच्या नैपुण्याचा उपयोग करुन घेणे योग्य ठरेल.

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निर्देश दिले की, प्राधिकरणाने तज्ञांच्या नैपुण्यतेचा ज्याठिकाणी उपयोग करुन घ्यावयाचा

आहे त्याठिकाणच्या कामाची व्याप्ती निश्चित करावी आणि आंतराष्ट्रीय प्रति व्यक्तीचा मासिक दर विचारात घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. प्राधिकरणाव्दारे कामाची व्याप्ती आणि खर्च ठरविण्यासाठी एक तज्ञ समिती गठीत करण्यात येईल. सदर समिती प्रकल्प निहाय कामाची व्याप्ती आणि खर्चाबाबत निर्णय घेईल. निश्चित केलेल्या अटीनुसार कामाची व्याप्ती व रक्कमेस कंपनीने सहमती दर्शविल्यास आवश्यक ती कामे सोपविण्यात येतील.

त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई महानगर प्रदेशात नागरी घनकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व प्रक्रियेतून उर्वरित कच-याची भरावभूमीमध्ये विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा येथील प्रकल्पासाठी प्रवर्तकाची नेमणूक.**

३.१ महानगर आयुक्त यांनी दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २३७ व्या बैठकीतील या प्रकल्पासंबंधीच्या निर्णयाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मे. रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड यांच्या निविदेची छाननी “सीव्हीसी मार्गदर्शकानुसार” व “विनंतीवजा-प्रस्ताव”(RFP) मधील तरतूदीनुसार करावी असे ठरविण्यात आले होते. मे. लिंक लिगल या प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या विधी सल्लागाराने मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लिमिटेड यांनी सादर केलेली निविदा “सिव्हीसी मार्गदर्शकानुसार” व “विनंतीवजा-प्रस्तावातील” अटीनुसार तपासल्यानंतर प्राधिकरणास हे काम मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लिमिटेड यांना सुपूर्द करण्यास कोणत्याही अटींचे उल्लंघन होत नाही असे स्पष्टीकरण दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या पत्रानुसार दिले.

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, मे. लिंक लिगल यांचे मत प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या महा अधिवक्ता यांचे याबाबतचे मत घेण्यासाठी प्राधिकरणाने महा अधिवक्ता यांना “सविस्तर प्रकरण” (Case for Opinion) सादर करुन अहवाल प्राप्त करुन घेतला. महा अधिवक्ता यांच्या दिनांक ०२ एप्रिल, २०१३ रोजीच्या अहवालातील मुद्दा क्र.२० नुसार मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लिमिटेड यांनी सादर केलेली निविदा “सिव्हीसी मार्गदर्शकानुसार” व प्राधिकरणाने मागविलेल्या “विनंतीवजा-प्रस्ताव”(RFP) नुसार

असल्याने व कोणत्याही अटींचे उल्लंघन झाले नसल्याने व त्यांची निविदा विधीतः ग्राहय असल्याने प्राधिकरणास मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लिमिटेड या प्रवर्तकास हे काम सुपूर्द करण्यास कोणतीही बाधा येणार नाही असा अहवाल दिला.

तथापी, आपल्या अहवालात मुद्दा क्र.२१ मध्ये महा अधिवक्ता यांनी मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लिमिटेड यांचेवर मे. रामकी फार्मा अथवा मेसर्स रामकीचे संचालक यांचेवरील सीबीआय तपासणी अथवा जप्ती आदेशामुळे त्यांची कंपनी अथवा स्थावर मालमत्ता यावर कोणताही परिणाम झालेला आहे किंवा कसे याबाबत प्राधिकरणाने तपासणी करावी असे सूचित केले. त्यानंतर, प्राधिकरणाने मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लिमिटेड यांचेकडून महा अधिवक्ता यांनी सूचित केल्यानुसार खुलासा मागविला असता त्यांनी त्यांचे दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजीच्या पत्राव्दारे असा खुलासा सादर केला की, सीबीआयव्दारे तपासणी अथवा तात्पुरत्या जप्ती आदेशामुळे त्यांची कंपनी अथवा स्थावर मालमत्ता यावर कोणताही परिणाम झालेला नसल्याने प्राधिकरणाच्या निविदेवर त्याचा कोणताही विपरीत परिणाम होणार नाही व हा प्रकल्प उभारण्यास ते सक्षम आहेत. तसेच मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लिमिटेड यांच्या वर उल्लेखिलेल्या हमीपत्रात प्राधिकरणाच्या सर्व अटी व शर्तीनुसार त्यांनी काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, मेसर्स रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लिमिटेड यांच्या निविदेची विधी ग्राहयता (Validity period) दिनांक १५.०३.२०१३ रोजी संपुष्टात आल्याने त्यात वाढ करण्याची गरज होती व ती दिनांक १५.०६.२०१३ पर्यंत त्यांनी वाढवली आहे.

३.३ सदर प्रकल्पासाठी लागणारी जमीन विकासकाला सवलतनामा कालावधीसाठी (concession period) भाडेपट्टयाने देण्याबाबत मागील बैठकीमध्ये विविध मते उपस्थित झाली होती. यासंदर्भात नगर विकास विभागाने सर्व नागरी स्वराज्य संस्थांसाठी समान धोरण लागू करण्याबाबतची मागणी महानगरपालिका आयुक्त यांनी केली होती त्यासंदर्भात मा. मुख्य सचिव यांनी प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांच्याकडे पुन्हा विचारणा केली. जमिन भाडेपट्टयाने दिल्यास ती तारण अथवा गहाण ठेवून त्यावर त्रयस्थ हक्क निर्माण होण्याची शक्यता असल्याने जमीनीचा भाडेपट्टा न करता सवलतनामा कराराच्या आधारेच विकासकाला जमीनीचा ताबा दयावा अशी नगर विकास विभागाची भूमिका बृहन्मुंबई

महानगरपालिकेच्या प्रकल्पाबाबत घेतल्याचे प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी सांगितले. त्यावर अति. महानगर आयुक्त (२) तसेच राज्य शासनाचे PPP Expert श्री. अजय सक्सेना हयांनी असे स्पष्ट केले की, प्राधिकरणाची "सार्वजनिक-खाजगी-सहभाग" (PPP) तत्वावर प्रकल्प राबविताना निविदाकारास जागा भाडेपट्टयावर देण्याची अट योग्य असून प्रकल्पावर भांडवली खर्च मोठया प्रमाणावर होणार असल्याने वित्तिय पुरवठादाराकडून वित्त पुरवठयासाठी त्याची गरज आहे. तळोजा येथील प्रकल्पासाठी जागा भाडेपट्टयावर देताना त्रयस्थांचे कोणत्याही प्रकारचे हितसंबंध तयार होणार नाहीत याबाबत स्पष्ट अटी व शर्ती करारात ठेवण्यात आलेल्या असून त्याबाबत संपूर्णपणे दक्षता घेण्यात आलेली आहे. कार्यकारी समितीचे सदस्य श्री. द. म. सुकथनकर हयांनी प्राधिकरणाची ही अट योग्य असल्याचे नमूद करुन शासनाच्या धोरणामध्ये समानता आणण्याच्या दृष्टीने नगर विकास विभागाने ही अट सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अश्या PPP प्रकल्पासाठी लागू करावी अशी सूचना केली.

श्री. मोहन अडतानी, अति. महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अशा प्रकारच्या अटींच्या अधिन राहून जमीन भाडेपट्टयाने देण्याची परवानगी बृहन्मुंबई महानगरपालिकेला देण्याबाबत विचार व्हावा अशी मागणी केली.

त्यानंतर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती यांनी प्राधिकरणाची जागा भाडेपट्टयावर देण्याबाबतची अट योग्य असल्याचे नमूद केले व अशा प्रकारचे धोरण अन्य नागरी स्वराज्य संस्थांना लागू करण्यासाठी नगर विकास विभागाने उचित कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

३.४ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती यांनी प्राधिकरणाच्या निविदेबाबत आणि प्रकल्पात सहभागी होणा-या सर्व स्थानिक स्वराज्य सस्थांची घनकचरा विल्हेवाटीसंबधी सद्य:स्थिती काय आहे याबाबतची माहिती घेतली. अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने जून, २००९ मध्ये सामाईक भरावभूमी प्रकल्पास सहभागी होण्याबाबत सहमती प्राप्त करण्यासाठी एकूण १३ महानगरपालिका व ७ नगरपरिषदांना पत्रे पाठविली होती. त्यामधील ६ महानगरपालिका/नगरपरिषदांनी म्हणजेच ठाणे महानगरपालिका, भिवंडी - निजामपूर महानगरपालिका, कल्याण - डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर

महानगर पालिका, अंबरनाथ नगरपरिषद, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांनी प्राधिकरणाच्या प्रकल्पात सामिल होण्यास आपली सहमती कळवली. त्यापैकी ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी त्यांचे स्तरावर स्वतंत्रपणे निविदा मागविल्या. त्यावर राज्य शासनाचे PPP Expert श्री. अजय सक्सेना यांनी असे सांगितले की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका येथील प्रकल्पासाठी टिपिंग फी व तळोजा प्रकल्पासाठी "टिपिंग फी" यामध्ये सुरुवातीच्या कालावधीसाठी जरी फरक असला तरी दोन्ही प्रकल्पामधील विभिन्न प्रतिवर्षी वाढ लक्षात घेता दिर्घ कालावधीमध्ये तळोजा येथील प्रकल्प किफायतशीर ठरेल असा अहवाल शासनाकडून कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेस दिलेला आहे.

त्यावर मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी ठाणे महानगरपालिकेने महासभेची मान्यता प्राप्त करुन प्राधिकरणाच्या प्रकल्पामध्ये सहभागी होण्याबाबत प्राधिकरणास सहमती दिल्यानंतर स्वतंत्रपणे निविदा प्रक्रिया सुरु करणे हे गैर असून याबाबत खंत व्यक्त केली.

ठाणे महानगरपालिकेने मागविलेल्या निविदेबाबत नगर विकास विभाग, ठाणे महानगरपालिकेचे अधिकारी व सचिव, पर्यावरण विभाग यांनी मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना स्पष्टीकरण सादर केले. तथापी, मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी ठाणे महानगरपालिकेले उचलेले पाऊल हे शासनाच्या प्रादेशिक स्तरावरील सामाईक सुविधेच्या विकासाच्या विरोधात असून अशा प्रकारचा निर्णय अयोग्य असून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना हया प्रकल्पात कश्याप्रकारे सहभागी करुन घेता येईल याबाबत नगर विकास विभागाने त्वरीत कार्यवाही करावी असे मत व्यक्त केले.

३.५ त्यानंतर, अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे नमूद केले की, प्राधिकरणाने या प्रकल्पासाठी तयार केलेल्या निविदांमधील तपशिल व मांडणी तयार करताना या क्षेत्रातील तज्ञांचे सहकार्य घेण्यात आले होते. "नीरी" (National Environmental Engineering Research Institute) या संस्थेकडून प्रकल्पाचा तांत्रिक तपशील तर मे. केपीएमजी (M/s.KPMG Advisory Services Pvt.Ltd.) यांचेकडून वित्तिय तपशिल व निविदांची दस्त ऐवजे तयार करुन घेण्यात आली होती. तसेच Planning Commission, Govt. of India यांचे PPP प्रकल्पासाठीचे मॉडेल डॉक्युमेंटचा या प्रकल्पासाठी उपयोग करण्यात आलेला आहे. देशपातळीवर राबविण्यात

आलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास सर्वसाधारणपणे ज्या जोखमी आतापर्यंत आढळून आल्या आहेत त्यांचा सखोल अभ्यास करुन या जोखमी पूर्णतः कमी करता येतील अशारीतीने तळोजा प्रकल्पाची संरचना करण्यात आली आहे त्यामुळे सदर प्रकल्प दिर्घकाळ यशस्वी ठरण्याची शाश्वती आहे. या प्रकल्पासाठीची निविदा प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शी व सुयोग्य असून प्राधिकरणाने अभ्यासपूर्वक कोणत्याही विशिष्ट तंत्रज्ञानाचा पुरस्कार न करता Technology Neutral निविदाप्रक्रियेचा अवलंब केला. प्राधिकरणाने या प्रकल्पासाठीची निविदा दस्तऐवजे मे. लिंक लिगल या तज्ञ विधी सल्लागारामार्फत प्रमाणित करुन घेतली जेणेकरुन निविदा ही सर्व कायदेविषयक बाबींची पडताळणी करण्यात आलेली आहे.

३.६ तळोजा प्रकल्पाबाबत माहिती देताना मे. केपीएमजी यांनी असे सादर केले की, या प्रकल्पामध्ये “टिपिंग फी” मध्ये “स्थिर व अस्थिर” (Fixed and variable) घटक असून त्यांचे प्रमाण ६०:४० आहे व “स्थिर घटकावर” १८०० मेट्रिक टन प्रती दिन हया प्रमाणानुसार अधिदान करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा सवलत करार कालावधी (Concession Period) २५ वर्षासाठीचा आहे. या प्रकल्पासाठीचा IRR सुमारे १३ टक्के आहे. मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लिमिटेड यांनी या प्रकल्पासाठी दिलेली टिपिंग फी अत्यंत वाजवी आहे. तर भारत देशातील याच क्षमतेच्या अन्य प्रकल्पांशी तुलना केल्यास तळोजा प्रकल्पासाठीची टिपिंग फी योग्य आहे असे मत के.पी.एम.जी. यांनी नमुद केले.

३.७ अति. महानगर आयुक्त (२) यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून असेही स्पष्ट केले की, तळोजा प्रकल्पासाठीच्या प्रस्तावित “टिपिंग फी” पैकी अंदाजे रु.२५० प्रती टन “टिपिंग फी” ही प्रादेशिक प्रकल्पासाठी आवश्यक असणा-या कचरा हस्तांतरण व वाहतूक व्यवस्थेसाठी आहे ही रक्कम वगळल्यास तळोजा प्रकल्प व ठाणे महानगरपालिका प्रकल्प यांच्या “टिपिंग फी” मधील फरक हा मर्यादित आहे. तळोजा प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक व वायु उत्सर्जनासाठीचे निकष हे European Union च्या निकषांच्या दर्जाचे असून त्यांनी विकासकाकडून उल्लंघन होऊ नये म्हणून करारनाम्यात त्यांच्यावर कडक दंडनिय कार्यवाहीची तरतूद आहे. प्रादेशिक घनकचरा व्यवस्थापन हे भविष्यकालीन सर्वागिण फायदयाचे दृष्टीने अंत्यत उपयुक्त असून सुरुवातीला ते तुलनेने काहीसे खर्चिक वाटले तरी दिर्घकालीन उपाययोजना या दृष्टीने ते नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक लाभदायक असल्याचे स्पष्ट केले.

३.८ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्राधिकरणाने हा प्रकल्प राबविणे अत्यंत गरजेचे असून घनकच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावली गेल्याने व नागरी घनकच-याची (व्यवस्थापन व हाताळणी ) नियमावली, २००० ची पूर्तता होणार असल्याने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्राधिकरणाच्या या प्रकल्पामध्ये सहभागी होणे अत्यंत गरजेचे आहे, म्हणून हया प्रकल्पाची उभारणी झालीच पाहिजे असे मत व्यक्त करुन प्राधिकरणाच्या या प्रकल्पाचे स्वागत केले.

३.९ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. द. म. सुकथनकर यांनी प्राधिकरणाचा हा प्रस्ताव ठाणे महानगरपालिका वगळून मान्य करण्यास सहमती दर्शविली. प्राधिकरणाच्या या प्रकल्पाबाबत कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी महानगरपालिका/नगरपरिषदांमधील अधिनियमात शासनाने सुधारणा केल्याने, आता सदर प्रकल्पात सहभागी होण्यासाठी ठाणे वगळता अन्य पाच नागरी स्वराज्य संस्थांना शासनामार्फत निर्देश देता येतील असे सांगितले. त्यावर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर पाच स्थानिक संस्थांना प्राधिकरणाच्या या प्रकल्पात सहभागी होण्यासाठी शासनाने नगर विकास विभागामार्फत आदेश निर्गमित करावेत असे निर्देश दिले. मात्र ठाणे महानगरपालिकेने आपली निविदा उघडली असल्याने त्यांनी दोन्ही प्रकल्पाचा व त्यांच्या दिर्घकालीन फायदा तोटयाचा अभ्यास करुन तळोजा प्रकल्पात सहभागी व्हावे किंवा कसे याचा निर्णय स्वतः घ्यावा असेही निर्देश मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी दिले.

कार्यकारी समितीचे सदस्य श्री. द. म. सुकथनकर यांनी या प्रकल्पाची जागा स्थानिक स्वराज्य संस्थांपासून लांब असल्याने प्राधिकरणाने शास्त्रोक्त पध्दतीने कच-यावर प्रक्रिया करुन उर्वरित कच-याची विल्हेवाट भरावभूमीमध्ये लावल्याने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अडचणी दूर होतील असे मत व्यक्त केले.

कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी ठाणे महानगरपालिका स्वतःचा प्रकल्प राबवित असल्याने ठाणे महानगर पालिका वगळून इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्राधिकरणाचा हा प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यास कोणतीही अडचण येणार नाही असे मत व्यक्त केले.

३.१० कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी ठाणे महानगरपालिका वगळून उर्वरित सर्व महानगरपालिका / नगरपरिषदांसाठी सामाईक भरावभूमी प्रकल्प हा उत्तम पर्याय असल्याने ठाणे महानगरपालिकेने सहभाग काढून घेतल्यास घनकच-यातील तूट भरुन काढण्यासाठी मुंबई महानगरपालिका, सिडको अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांना या प्रकल्पात सहभागी होण्यासाठी त्यांचे समवेत चर्चा करावी व त्यांना या प्रकल्पात सहभागी होण्याची शक्यता पडताळावी व त्यानुसार सवलत करारनाम्यामध्ये अंतर्भाव करुन व प्राधिकरणाने प्रवर्तकाची नेमणूक करुन प्रकल्पाची अंमलबजावणी करावी असे मत व्यक्त केले व मुख्य सचिवांनी त्यास मान्यता देऊन खालील ठराव मान्य केला.

<u>ठराव क्र. : १२२७</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन खालील प्रस्तावास मान्यता दिली :-

अ) वरील सर्व निकषांनुसार पात्र ठरलेल्या मे. रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लिमिटेड-कन्सोरटिअम यांना १८०० मेट्रीक टन प्रतिदिन क्षमतेचा प्रकल्प २५ वर्षाच्या कालावधीसाठी उभारण्यास त्यांनी दिलेली विनंती-वजा-प्रस्तावानुसार टिपिंग फी रुपये ८१९/- प्रति मेट्रिक टन व त्यानंतर प्रतिवर्षी WPI वर आधारीत फक्त A-part वर (अस्थिर घटकावर) येणा-या वाढीव रक्कमेनुसार येणारी "टिपिंग फी" बाब टिप्पणीतील **<u>जोडपत्र - ७</u>** नुसार व विनंती व वजा प्रस्ताव (RFP) मधील सर्व अटींसह हा प्रस्ताव स्विकारण्यास व त्यानुसार प्रतीवर्षी येणा-या खर्चास मान्यता दिली.

ब) तळोजा येथील उसाटणे गावाजवळील शासनाच्या महसूल व वन विभाग यांच्या परिपत्रकानुसार दिनांक ३० जुलै २०१०च्या प्राधिकरणाच्या ताब्यात असलेली, एकूण अंदाजे ५० हेक्टर शासकीय व खाजगी जमीन, प्रवर्तकास या प्रकल्पाच्या उभारणीसाठी निविदेतील अटीनुसार भाडेपटटयावर २५ वर्षासाठी देण्यास मान्यता दिली.

क) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील महानगरपालिका / नगरपरिषदांसाठी नागरी घनकच-याची २५ वर्षाच्या दिर्घ मुदतीच्या तत्त्वावर तळोजा येथे “सामाईक भरावभूमी” प्रकल्पाची उभारणी व सामाईक भरावभूमी प्रकल्प राज्य शासनाकडून प्राधिकरणास अधिसूचित करण्यासाठी नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून कार्यवाही करण्यास मान्यता दिली.

ड) प्राधिकरणाच्या या प्रकल्पामध्ये सहभागी होणा-या महानगरपालिका/नगरपरिषदांना सामाईक भरावभूमी प्रकल्पात सहभागी होणे बंधनकारक करण्यासाठी “महानगरपालिका व नगरपरिषदा (तिसरी सुधारणा) अधिनियम २०१२”, दिनांक २० डिसेंबर, २०१२ नुसार राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा “अटी व शर्तीनुसार” हया सुविधेत सहभागी होणे अनिवार्य करण्याचे निदेश देण्याबाबतची कार्यवाही नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत करण्याबाबत मान्यता दिली.

इ) ठाणे महानगरपालिका प्राधिकरणाच्या प्रकल्पामध्ये सहभागी होणार नसल्याबाबतचा निर्णय झाल्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शिफारस केलेल्या मे. मेसर्स रामकी एन्व्हायरो इंजिनिअर्स लिमिटेड हया प्रवर्तकासमवेत कमी क्षमतेचा प्रकल्प उभारणीच्या शक्यतेबाबत चर्चा करुन त्याबाबत त्यांचेकडून सहमती प्राप्त करुन प्राधिकरणाने प्रवर्तकास कार्यालयीन आदेश देऊन प्रकल्प लवकरात लवकर उभारण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत मान्यता दिली.

ई) प्रकल्पासाठी खाजगी जमिनी अधिग्रहित करणे, पायाभूत सुविधा, विकास कामे करणे, पुनर्वसन व पुनर्वसाहत करणे इत्यादीवरील अंदाजित रु.२३ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता दिली.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधीची आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही व सहभागी होणा-या स्थानिक स्वराज्य संस्थासमवेत करारनामा करण्यास व हा प्रकल्पाची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्यासाठी व योग्य ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे.”

**बाब क्र.४ : वांद्रे-कुर्ला संकुल येथील ९ भूखंड तसेच वडाळा अधिसूचित क्षेत्र येथील ३ भूखंडावर नियोजित इमारतींना भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडून अधिक उंची मंजूर करण्याकरिता एअरोनॉटीकल स्टडीच्या (Aeronautical Strudy) शुल्कापोटी अदा करण्यात आलेल्या रक्कमेसाठी कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मालकीच्या वांद्रे-कुर्ला संकुल तसेच वडाळा भारवाहक तळ या विशेष नियोजन क्षेत्रांमधील उपलब्ध चटई क्षेत्र निर्देशांक संपूर्णतः वापरण्याकरीता या क्षेत्रांमध्ये अधिक उंच इमारतींचे बांधकाम होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे या क्षेत्रांमधील इमारतींना अधिक उंचीसाठी भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाचे (AAI) ना-हरकत प्रमाणपत्र मिळावे याकरीता प्राधिकरण सतत AAI यांना विनंती करीत होते. त्या अनुषंगाने प्राधिकरणाने आपल्या दिनांक २४ जानेवारी, २०१३ रोजीच्या पत्रान्वये भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांना वांद्रे-कुर्ला संकुलातील ९ भूखंड व वडाळा अधिसूचित क्षेत्रातील ३ भूखंडावर इमारतींना अधिक उंची मिळावी यासाठी एअरोनॉटिकल स्टडी करण्याची विनंती केली आहे व त्याकरीता भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या सूचनेनुसार प्रथम अपिलीय समितीकडे रु. २,२४,७२०/- एवढे व त्यानंतर एअरोनॉटिकल स्टडीचे रु. २२,४७,२००/- प्रती भूखंड एवढे शुल्क म्हणजे एकूण १२ भूखंडांकरीता रु.२,६९,६६,४००/- एवढे शुल्क भरणा करुन या संदर्भात त्यांच्याशी करार केला आहे.

४.२ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास एअरोनॉटिकल स्टडीची रक्कम तातडीने भरणा करावयाची असल्यामुळे त्याकरीता एकूण रु.२,७१,९१,१२०/- (रु.२,२४,७२०/- + रु.२,६९,६६,४००/-) एवढया खर्चास कार्यकारी समितीची कार्योत्तर मान्यता मिळावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

४.३ यावर कार्यकारी समितीचे सदस्य श्री. ना.वि.मिराणी यांनी Aeronautical Study म्हणजे काय असते व त्याकरीता एवढे जास्त शुल्क का भरावे लागते व सदर स्टडी कोण करीत आहे असे विचारले. यावर महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुल व वडाळा अधिसूचित क्षेत्र येथील काही विनिर्दिष्ट भूखंडांवरील इमारतींना अधिक उंची

मिळावी यासाठी भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांचे मार्फत एअरोनॉटिकल स्टडी (Aeronautical Study) करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत AAI ने वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये साधारण ४६ मी. एवढी इमारतींची उंची अनुज्ञेय होईल असे कळविले आहे. त्यामुळे या क्षेत्रात इमारतींना अधिक उंची मिळावी याकरीता प्राधिकरणाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, नागरी विमानचालन मंत्रालय (Ministry of Civil Aviation) व मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. यांच्या अधिका-यांसोबत बैठका घेतल्या. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदर स्टडी ही AAI करीत असून त्यासाठीचे शुल्क त्यांच्या नियमानुसार ठरलेले आहेत. यावर कार्यकारी समितीचे सदस्य श्री. द. म. सुकथनकर, यांनी सुचविले की, सदर खर्च हा भूखंडांच्या वाटपग्राहींकडून वसूल करावा. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वडाळा येथील एक भूखंड वगळता वरील सर्व भूखंडांचे अद्याप वाटप झालेले नाही. सदर भूखंडांचे वाटप हे निविदा मागवून करण्यात येईल व सदर निविदांद्वारे या भूखंडांकरीता बाजारभाव किंवा त्यापेक्षाही अधिक भाडेपट्टा अधिमूल्य प्राधिकरणास प्राप्त होण्याची शक्यता आहे.

सदर भाडेपट्टा अधिमूल्याच्या रक्कमेच्या तुलनेत या स्टडीचा खर्च अत्यल्प असल्यामुळे तो प्राधिकरणाने सोसण्यास हरकत नाही. तसेच यापूर्वीच वाटप केलेल्या वडाळा येथील भूखंडाच्या भूखंडधारकाने सदर खर्च अदा करण्यास सहमती दिली आहे. यावर मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, सदर बाबीचा उल्लेख बाब टिप्पणीमध्ये देखील केला आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की प्राधिकरणाने AAI यांना वांद्रे-कुर्ला संकुलातील संपूर्ण "जी" ब्लॉक करीता एक समान उंची द्यावी अशी देखील विनंती केली आहे व त्या संदर्भात अभ्यास सुरु आहे.

४.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १२२८ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन

कार्यकारी समिती याव्दारे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांना वांद्रे-कुर्ला संकुलातील ९ भूखंड व वडाळा अधिसुचित क्षेत्रातील ३ भूखंडावरील इमारतींना अधिक उंची मिळावी याकरीता एअरोनॉटिकल स्टडीच्या शुल्कापोटी अदा करण्यात आलेल्या एकूण रु.२,७१,९१,१२०/- (रु.२,२४,७२०/- + रु.२,६९,६६,४००/-) एवढया खर्चास कार्योत्तर मान्यता देत आहे."

**बाब क्र.५ : पूर्व द्रुतगती महामार्गावरील जी.एम.एल.आर. जंक्शन ते जे.व्ही.एल.आर. जंक्शन येथे रस्ता रुंदीकरण करणे साखळी क्र.५६८/७०० ते ५७२/६०० पॅकेज - १४ (सुधारित मान्यता प्रदान करणेबाबत).**

५.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुलूंड चेकनाका ते सायन या पूर्व द्रुतगती महामार्गाचे रुंदीकरण व सुधारणेचे काम पॅकेज क्र.११ ते १५ अशा पाच पॅकेजेस अंतर्गत हाती घेण्यात आले होते. सदरील कामांपैकी पॅकेज क्र. १४ मधील पश्चिम बाजूकडील सेवामार्ग व मुख्य रस्त्यालगतची गटारे ही कामे, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आलेल्या ३००० मि.मि. व्यासाच्या जलवाहिनी टाकण्याच्या कामास विलंब झाल्यामुळे विहित मुदतीत हाती घेता आली नाहीत. तसेच सन २००५ मधील अतिवृष्टिमुळे बृहन्मंबई महानगरपालिकेने अस्तित्वातील पुलांचा waterway वाढविण्यासाठी BRIMSTOWAD व सत्य शोधन समितीची (Fact Finding Committee) नियुक्ती केली होती व त्यांचा अहवाल प्राप्त होण्यास झालेल्या विलंबामुळे साखळी क्र.५७१/०७० मधील उषानगर नाल्यावरील पुलाचे कामही विहित कालावधीत पूर्ण करणे शक्य झाले नाही. महानगर आयुक्त यांनी यापुर्वी पॅकेज क्र. १४ वर झालेला खर्च रु.३०.७९ कोटी तसेच उर्वरीत व अतिरिक्त कामांची किंमत रु.२४.५९ कोटीस अशा एकूण रु.५५.३८ कोटी खर्चास कार्यकारी समितीने त्यांच्या दिनांक २१ फेब्रुवारी, २००८ रोजी झालेल्या २२३व्या बैठकीत ठराव क्र.१०८३ अन्वये मंजुरी दिलेली आहे, असे विषद केले. त्या अनुषंगाने उर्वरित काम प्रगतिपथावर होते, तथापि, रस्त्यावरील अतिक्रमण काढणे, अस्तित्वातील सेवा वाहिन्या स्थलांतरीत करणे, पश्चिम सेवामार्गात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आलेल्या ३००० मि.मि. व्यासाच्या जलवाहिनी टाकणे या कामांत झालेला विलंब तसेच शासनाच्या नवीन धोरणामुळे निर्माण झालेली वाळूची

टंचाई यांमुळे सदरील काम विहीत कालावधीत पूर्ण करणे शक्य झाले नाही. यास्तव कंत्राटदारास दिनांक ३० जून, २००९ नंतर केलेल्या कामास भाववाढ देय होणार नाही या अटीवर दिनांक १५ डिसेंबर, २०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. कार्यकारी समितीचे सदस्य श्री. ना.वि.मिराणी यांनी कामाची सद्यःस्थिती बाबत विचारणा केली असता त्यावर अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी सदर काम दिनांक १५ डिसेंबर, २०१० रोजी पूर्ण झाले असून पूर्व द्रुतगती महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे असे सांगितले.

५.२ सदर बाब टिप्पणीच्या अनुषंगाने महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने ३००० मी.मी. व्यासाची पाण्याची पाईपलाईन सेवामार्गात जास्त खोलीवर टाकून त्यावर खोदलेली खराब माती टाकल्याने कामाच्या खोदाई व भराई या बाबींमध्ये वाढ झाली असून त्यामुळे रस्त्यालगतच्या सुरक्षा भिंतीची (Retaining wall) उंचीही वाढली. यामुळे कामाच्या किंमतीमध्ये रु.५.२० कोटी इतकी अतिरिक्त वाढ झाली असून निविदा शर्तीनुसार कंत्राटदाराने दिनांक ३० जून, २००९ पर्यंत केलेल्या कामावर भाववाढ खंडापोटी रु.७.५८ कोटी इतकी रक्कम देय होत आहे. त्यानुसार पूर्ण झालेल्या कामावरील एकूण अपेक्षित खर्च रु.६८.१६ कोटी इतका होत आहे.

५.३ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. ना.वि.मिराणी यांनी बाब टिप्पणीमध्ये कंत्राटदाराच्या दाव्यांचा उल्लेख आहे व त्या दाव्यापोटी द्याव्या लागणा-या रकमेची तरतूद या सुधारीत किमंतीत करण्यात आली आहे काय असे विचारले. त्यावर अतिरीक्त महानगर आयुक्त (२) यांनी असा खुलासा केला की, कंत्राटदाराच्या सर्व मागण्या मुख्य अभियंता स्तरावर नाकारण्यात आल्या असुन कंत्राटदाराने निविदा शर्तीनुसार अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांच्याकडे अपील दाखल केले आहे. त्यावर दिनांक १० एप्रिल, २०१३ रोजी अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी सुनावणी घेतली असून पुढील प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर काही रक्कम देय ठरल्यास त्यानुरुप प्रस्ताव कार्यकारी समितीकडे स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल.

५.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. १२२९ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप-कलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे पूर्व द्रुतगती महामार्गावरील "जी.एम.एल.आर. जंक्शन ते जे.व्ही.एल.आर. जंक्शन (साखळी क्र.५६८/७०० ते ५७२/६००) या पॅकेज क्र. १४" या कामावर रु.६८.१६ कोटी एवढया सुधारीत किंमतीस संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येतो की,** वरील ठरावाच्या अंमलबजावणी करण्यासंबंधीची आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त हयांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.६ :</u>** **<u>खेरवाडी जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूलाच्या बांधकामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणी सल्लागाराच्या नियुक्तीबाबत.</u>**

६.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा अंतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील खेरवाडी जंक्शन येथे होणा-या वाहतूकीची कोंडी लक्षात घेता मे. स्टुप कन्सल्टंट प्रा. लि. यांनी खेरवाडी जंक्शन येथे ५८१.०० मी. लांबीचा व २४.०० मी. रुंदीचा (३+३) उड्डाणपूल बांधण्याचे प्रस्तावित केले. उड्डाणपूलाच्या बांधकामाकरीता इच्छुक कंत्राटदारांकडून ठोक रक्कमेवर त्यांच्या संकल्पचित्रावर आधारीत दिनांक १२ ऑगस्ट, २०१२ रोजी जाहीररीत्या निविदा मागविण्यात आल्या त्यातील मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा.लि. यांच्या रु. २१.९६ कोटी लघुत्तम निविदेस कार्यकारी समितीने दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या २३७ व्या बैठकीत ठराव क्र. १२२२ अन्वये मंजूरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने पुढील निविदेची विहीत कार्यवाही पूर्ण करुन दिनांक २९ एप्रिल, २०१३ रोजी ठेकेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आले. परंतु वाहतूक विभागाची दिनांक ३१ मे, २०१३ पर्यंतच परवानगी असल्याने त्यांनी सूचविल्याप्रमाणे टप्पाटप्पाने काम हाती घेण्यात आलेले आहे. मे. स्टुप कन्सल्टंट

..१८/-

प्रा. लि. यांच्या कामाचा वाव फक्त प्रकल्प आराखडा बनविणे व निविदा छाननी करणे इतकाच होता. दरम्यान इच्छुक सल्लागारांकडून सदर उड्डाणपूलाच्या बांधकामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणी करणेकरीता विनंती प्रस्ताव दिनांक २७ डिसेंबर, २०१२ रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देऊन मागविण्यात आला. त्यास अनुसरुन एकूण ९ सल्लागारांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते.

६.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्राप्त झालेल्या प्रस्तावाचे तांत्रिक व वित्तीय मुल्यमापन करणेकरीता मुख्य अभियंता यांच्या मान्यतेने मुल्यमापन समिती गठीत करण्यात आली. प्राप्त झालेले सर्व ९ विनंती प्रस्ताव निविदा सूचनेतील पूर्व अर्हता निकषानुसार तपासण्यात आले. तांत्रिक मुल्यमापन पूर्ण केले असता खालील तीन सल्लागारांना तांत्रिक निकषानुसार ८०% पेक्षा जास्त गुण मिळाल्यामुळे त्यांचे वित्तीय प्रस्ताव दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी सल्लागारांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडण्यात आले. वित्तीय प्रस्तावामध्ये सल्लागारांनी मागणी केलेली फी पुढीलप्रमाणे आहे :

| **अ.क्र.** | **सल्लागारांचे नाव** | **एकत्रित नमूद केलेली फी रु.** | **आर्थिक गुण** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | मे. एस्.एन्. भोबे ॲन्ड असोसिएटस् | ८५,६४,४००/- | १२.४६ |
| २ | मे. स्टुप कन्सल्टंट प्रा. लि. | १,३१,१०,१२०/- | ८.१४ |
| ३ | मे. एक्ससीसी इंजिनियर्स ॲन्ड प्लॅनर्स | ५३,३६,२८०/- | २० |

विनंती प्रस्तावास अनुसरुन तांत्रिक व वित्तीय गुण संयुक्त करताना तांत्रिक निकषाला ८०% भार आणि आर्थिक निकषाला २०% भार देण्यात आले. त्याप्रमाणे संयुक्त निकष खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहे :

| **अ. क्र.** | **सल्लागारांचे नाव** | **तांत्रिक भार** | **आर्थिक भार** | **संयुक्त गुण** | **श्रेणी** |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. एस्.एन्. भोबे ॲन्ड असोसिएटस् | ६९.६० | १२.४६ | ८२.०६ | **अधिकतम ३** |
| २ | मे. स्टुप कन्सल्टंट प्रा. लि. | ७७.६० | ८.१४ | ८५.७४ | **अधिकतम २** |
| ३ | मे. एक्ससीसी इंजिनियर्स ॲन्ड प्लॅनर्स | ७२.८० | २० | ९२.८० | **अधिकतम १** |

६.३ सदर प्रस्तावास अनुसरुन जो सल्लागार संयुक्तिक, तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण संपादन करेल, अशा सल्लागारास प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून नेमण्यात येईल असे नमूद करण्यात आले होते. त्याप्रमाणे मे. एक्ससीसी इंजिनियर्स ॲन्ड प्लॅनर्स यांचे संयुक्त तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण असल्यामुळे मे. एक्ससीसी इंजिनियर्स ॲन्ड प्लॅनर्स यांना प्रकल्प व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणी सल्लागार म्हणून उपरोक्त उड्डाणपूलाच्या बांधकामाकरीता नेमणूक करण्यास्तव शिफारस करण्यात येत आहे.

६.४ चर्चेदरम्यान, कार्यकारी समितीचे सदस्य श्री. ना.वि.मिराणी यांनी असे नमूद केले की, भविष्यात अशा प्रकारच्या सर्व कामांकरीता सल्लागाराच्या प्राप्त झालेल्या निविदांची/प्रस्तावाची पूर्व अर्हता निकषानुसार तांत्रिक व वित्तीय मुल्यमापन करणेकरीता अति. महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने तांत्रिक व वित्तीय मुल्यमापन समिती गठीत करण्यात यावी.

६.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १२३० :</u>

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे खेरवाडी जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूलाच्या बांधकामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणी सल्लागार म्हणून मे.एक्ससीसी इंजिनियर्स ॲन्ड प्लॅनर्स यांची रु. ५३,३६,२८०/- अधिक सेवा कर (Service Tax) इतक्या शुल्कावर नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**“आणखी असा ठराव करण्यात येतो की,** वरील ठरावाच्या अंमलबजावणी करण्यासंबंधीची आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त हयांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**<u>बाब क्र.७ :</u> <u>चेंबूर येथील बी.पी.सि.एल. समोरील चरिष्मा, नागाबाबानगर जवळ, आर.एन.ए. (रॉकलाईन) व तुंगवा व्हिलेज, मिलिंद नगर, पवई येथील पुनर्वसन वसाहतीतील इमारतींच्या गच्चीचे, स्नानगृह, शौचालय व स्वयंपाक घरातील गळती प्रतिबंधक कामे करणे, मल:निसारण / सांडपाणी वाहिनीसाठी यु.पी.व्ही.सी. पाईप बसविणे व इतर किरकोळ कामे करणे.</u>**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले आहे की, पुनर्वसन व पुनर्वसाहत इमारतीची व वसाहतींची देखभाल व व्यवस्थापनाची जबाबदारी संबंधित नोंदणीकृत संस्थाकडे वर्ग करण्याच्या दृष्टीने व बहीर्गमन कृती आराखडा (एक्झीट ॲक्शन प्लान) च्या धोरणानुसार "प्रकल्प बाधितांच्या नोंदणीकृत संस्थांच्या इमारतीमध्ये राहणा-या प्रकल्प बाधितांचे आरोग्य, स्वच्छता व पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून आवश्यक कामे जसे इमारतींच्या गच्चीचे, स्नानगृह, शौचालय व स्वयंपाकघरातील गळती प्रतिबंधक कामे करणे, मल:निसारण / सांडपाणी वाहिनीसाठी यु.पी.व्ही.सी पाईप बसविणे व इतर किरकोळ कामे एकवेळ करण्यासाठी नोंदणीकृत संस्थाकडून रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र प्राधिकरणाकडे सादर केल्यानंतर सदर दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येत असतात.

७.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सागितले की, सदर इमारतींच्या दुरुस्तीची कामे प्राधिकरणाने एक वेळेस करुन दिल्यानंतर भविष्यात उद्‌भवणारी दुरुस्तीची कामे संस्था स्वखर्चाने करेल. प्रकल्पबाधितांचे आरोग्य व राहणीमानाच्या दृष्टीने व बहिर्गमन कृती आराखडा (एक्झीट ॲक्शन प्लान) नुसार खालील कामाची अंदाजपत्रके सन २००९-१०च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आली आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (रुपये) |
|---|---|---|
| १) | बी.पी.सी.एल, चेंबूर समोरील चरिष्मा वसाहतीतील इमारतींच्या गच्चीचे, स्नानगृह, शौचालय व स्वयंपाक घरातील गळती प्रतिबंधक कामे करणे मल:निसारण / सांडपाणी वाहिनीसाठी यु.पी.व्ही.सी पाईप बसविणे व इतर किरकोळ कामे करणे. | ११,१४,३८,०००/- |
| २) | नागाबाबा नगर, चेंबूर जवळील आर.एन.ए. (रॉकलाईन) वसाहतीतील इमारतींच्या गच्चीचे, गच्चीवरील पाण्याच्या टाकीचे, स्नानगृह, शौचालय व स्वयंपाक घरातील गळती प्रतिबंधक कामे करणे व सदर इमारतींना मल:निसारण / सांडपाणी वाहिनीसाठी यु.पी.व्ही.सी पाईप बसविणे व इतर किरकोळ इत्यादी कामे करणे. | १४,२७,२९,६२३/- |
| ३) | झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत सिटी सर्व्हे क्र.९०, ९१, ९२, ९६ आणि १०७ (भाग) व्हिलेज तुंगांवा मिलींदनगर पवई येथील पायाभूत सुविधा दुरुस्ती, इमारतींच्या शौचालय, स्नानगृह, गळती प्रतिबंधक कामे, बाहय भितींच्या मलमपट्टी व जलभेघ रंगविणे इत्यादी कामे करणे. | १३,३७,५४,०००/- |

वर नमूद तीनही कामांना मान्यता मिळाल्यानंतर रितसर जाहिरातीद्वारे निविदा मागविण्यात आल्या. तद्नंतर तीनही कामांच्या निविदा उघडल्यानंतर प्रत्येक कामाच्या लघुत्तम निविदाकारांचे देकार निविदा समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात आले. सदर तीनही कामांच्या प्रस्तावांवर निविदा समितीच्या सदस्यांची चर्चा होऊन प्रत्येक कामाच्या लघुत्तम निविदाकारांची निविदा स्विकारण्यास व कार्यकारी समितीस अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यास शिफारस केली.

७.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, वरील सर्व बाबी विचारात घेऊन कार्यकारी समितीस अशी शिफारस करण्यात येते की, अ.क्र. (१) मधील नमूद कामासाठी मेसर्स ओमकार इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांची निविदा कामाच्या अंदाजित रक्कम रु.११,१४,३८,०००/- च्या १९.०९% कमी दराची म्हणजे रु.९,०१,६४,४८६/- रक्कमेची लघुत्तम निविदा स्विकारण्यात यावी. अ.क्र. (२) मधील नमूद कामासाठी मे. आर.के.मधानी ॲन्ड कंपनी यांची निविदा कामाच्या अंदाजित रक्कम रु.१४,२७,२९,६२३/-च्या १८.७८% कमी म्हणजे रु.११,५९,२५,०००/- रक्कमेची लघुत्तम निविदा स्विकारण्यात यावी. तसेच अ.क्र. (३) मधील नमूद कामासाठी मे.पी.बी.कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा कामाच्या अंदाजित रक्कम रु.१३,३७,५४,०००/-च्या ९.६२% जास्त म्हणजे रु.१४,६६,२१,१३५/- रक्कमेची लघुत्तम निविदा स्विकारण्यात यावी.

७.४ त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>**ठराव क्र. १२३१ :**</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप-कलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे खालील कामांच्या लघुत्तम निविदा स्विकारण्यात येत आहेत व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे :-

१) बी.पी.सी.एल., चेंबूर समोरील चरिष्मा वसाहतीतील इमारतींच्या गच्चीचे, स्नानगृह, शौचालय व स्वयंपाक घरातील गळती प्रतिबंधक कामे करणे, मल:निसारण / सांडपाणी वाहिनीसाठी यु.पी.व्हि.सी. पाईप बसविणे व इतर किरकोळ कामे करणे या कामासाठी मे. ओमकार

इंजिनिअर्स अँन्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांची अंदाजित रक्कमेच्या १९.०९% कमी किंमतीची म्हणजे रु.९,०१,६४,४८६/- (रुपये नऊ कोटी एक लाख चौसष्ट हजार चारशे शहाऐंशी फक्त) किंमतीची लघुत्तम निविदा.

२) नागाबाबा नगर चेंबूर जवळील आर.एन.ए. (रॉकलाईन) वसाहतीतील इमारतींच्या गच्चीचे, गच्चीवरील पाण्याच्या टाकीचे, स्नानगृह, शौचालय व स्वयंपाक घरातील गळती प्रतिबंधक कामे करणे व सदर इमारतींना मल:निसारण / सांडपाणी वाहिनीसाठी यु.पी.व्ही.सी पाईप बसविणे व इतर किरकोळ इत्यादी कामे करणे या कामासाठी मे.आर.के.मधानी अँन्ड कंपनी यांची अंदाजित रक्कमेच्या १८.७८% कमी किंमतीची म्हणजेच रु. ११,५९,२५,०००/- (रुपये अकरा कोटी एकोणसाठ लाख पंचवीस हजार फक्त) किंमतीची लघुत्तम निविदा.

३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत सिटी सर्व्हे क्र.९०, ९१, ९२, ९६ आणि १०७ (भाग) व्हिलेज तुंगांवा मिलींदनगर पवई येथील पायाभूत सुविधा दुरुस्ती, येथील इमारतींच्या शौचालय, स्नानगृह, गळती प्रतिबंधक कामे, बाहय भितींच्या मलमपट्टी व जलभेघ रंगविणे इत्यादी कामे करणे या कामासाठी मे.पी.बी.कन्स्ट्रक्शन कं. यांची अंदाजित रक्कमेच्या ९.६२% जास्त किमंतीची म्हणजे रु.१४,६६,२१,१३५/- (रुपये चौदा कोटी सहासष्ठ लाख एकवीस हजार एकशे पस्तीस फक्त) किंमतीची लघुत्तम निविदा.

**“असाही ठराव करण्यात येतो की,** वरील ठरावाच्या अंमलबजावणी करण्यासंबंधीची आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त हयांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.८ : सांताक्रुझ चेंबूर जोडरस्त्यामुळे नवीन टिळक नगर, म्हाडा कॉलनी, चेंबूर येथील बाधीत १३ इमारतीमधील गाळेधारकांचे पुनर्वसन करणेच्या कामी उद्भवलेल्या अतिरिक्त कामांस व कंत्राटाच्या मुदतवाढीस मान्यता मिळणेबाबत.**

८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सांताक्रुझ चेंबूर जोडरस्त्याच्या कामामुळे नवीन टिळक नगर म्हाडा कॉलनी, चेंबूर येथील बाधीत १३ इमारतीमधील गाळेधारकांचे पुनर्वसन करणेच्या कामी आवश्यकतेनुसार व स्थळ परिस्थितीनुसार काही अतिरीक्त कामे करावी लागली. तसेच कामाच्या व्याप्तीमध्ये वाढ झाली. मुख्यत्त्वेकरुन

पुढील ६ बाबींमुळे खर्चात वाढ झाली :

**अ) भूखंडच्या सीमारेषेवर करावे लागलेले शोअरींग / टच पायलिंग :**

नवीन विकास नियंत्रण कायद्याप्रमाणे पार्किंगची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधिकरणास दोन्ही इमारतींमध्ये एका खाली एक म्हणजेच दुमजली तळघरांचे प्रयोजन करावे लागले. सदर दुमजली तळघरांसाठी जमिनीच्या पृष्ठभागापासून जवळपास १० ते १२ मीटर खोल खोदकाम करावे लागणार आहे. सदर खोदकामामुळे बाजूचा भूखंड / जमीन खचणे, संलग्न रस्ता खचणे तसेच लागून असलेल्या इमारतींच्या बांधकामाच्या संरक्षणाच्या दृष्टीने भुखंडाच्या सिमांकनास ३०० मी.मी. व्यासाचे शोअरींग / टच पायलिंग करण्यात आले व त्यासाठी मान्य केलेला अतिरिक्त खर्च हा रु.११,०५,३२,९४५/- इतका आहे.

**ब) दोन तळघराच्या बांधकामासाठी (Double basement) भूगर्भातील दगडाच्या खोदकामामुळे खर्चामध्ये झालेली वाढ :**

नवीन विकास नियंत्रण विनियमाप्रमाणे करावे लागणारे दुमजली तळघर, यामुळे जमिनीमध्ये जवळपास १० ते १२ मीटर खोल खोदकाम करावे लागत आहे. भूगर्भ तपासणीनुसार (Bore log details) भूपृष्ठापासून जवळपास ४ ते ५ मीटर खोलीपासून खडक सापडत आहेत व त्यामुळे खडकाच्या खोदकामासाठी रु.१२,९२,२१,८००/- एवढ्या रक्कमेचा अतिरिक्त खर्च येत आहे.

**क) मे.निना कंपनीतर्फे पेनेट्रोन हे ॲडमिक्सचर वापरुन क्रिस्टलाईन पध्दतीने जल प्रतिबंधक (water proofing) करणे :**

मुळ कंत्राटात तळघरासाठी बॉक्स टाईप जलप्रतिबंधक (Box-type waterproofing) करण्याची तरतुद आहे. परंतु अशा प्रकारचे काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात शहाबादी फरशा, मुबलक प्रमाणात दर्जेदार वाळूची उपलब्धता लागते. परंतु सद्य:स्थितीत दर्जेदार वाळू मिळणे दुर्मिळ झाले आहे व तसेच अशा प्रकारे जलप्रतिबंधकाचे काम करण्यासाठी भरपूर वेळ वाया जाणार आहे. या दोन्ही गोष्टींचा विचार करुन मे.निना कंपनीतर्फे पेनेट्रोन हे ॲडमिक्सचर वापरुन क्रिस्टलाईन पध्दतीने जल प्रतिबंधक करण्यात येत आहे. सदर कामासाठी रु.१,५४,७३,१३९/- इतका अतिरीक्त खर्च येणार आहे.

**ड) इतर अतिरीक्त कामे उदा. पंपाने पाण्याचा उपसा करणे, सेवा वाहिन्यांचे स्थलांतर करणे व इतर :**

भूपृष्ठापासून जमिनीमध्ये १० ते १२ मीटर खोल खोदकाम करावे लागत असल्याकारणाने मोठ्या प्रमाणात जमिनित (खोदकाम करावयाच्या भागात) पाणी जमा होत आहे व त्यामुळे खोदकाम करण्याच्या कामात अडचणी निर्माण होत आहेत. मूळ कंत्राटामध्ये अशा प्रकारच्या पाण्याचा उपसा करण्याची तरतूद नाही. तसेच मध्यम उत्पन्न गट इमारतीसाठी खोदकाम करतांना तेथील जमिनीखाली सेप्टीक टँक आढळून आली व सदर सेप्टीक टँकमार्फत सभोवतालच्या अस्तित्वात असलेले तीन इमारतींच्या सांडपाण्याचा निचरा तेथील जवळील नाल्यात करण्यात येत होता. त्यामुळे सदर इमारतींचा सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी निचरा वाहिन्यांच्या स्थलांतराचे काम करावे लागले. वर नमूद केलेली दोन्ही कामे ही अतिरीक्त कामे असल्याने त्यांचा अतिरीक्त खर्च रु.२१,५७,५००/- इतका आहे.

**इ) अतिरीक्त / जादा बांधकाम करण्यात येत असलेल्या तळघराची किंमत :**

नवीन विकास नियंत्रण विनियमाप्रमाणे पार्किंगची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधिकरणास एका खाली एक म्हणजेच दुमजली तळघरांचे प्रयोजन करावे लागले. सदर अतिरीक्त तळघराची किंमत ही निविदेतील दिलेल्या बाबींनुसार अंदाजे रु.५,१८,६९,२८०/- इतकी आहे.

**फ) बाजारातील भाववाढीमुळे (price escalation) वाढणारी किंमत :**

सदर कामाचा देकार हा कंत्राटदारास दिनांक ०२ मार्च, २०११ रोजी देण्यात आला व सद्य:स्थितीत बाजारातील भाववाढ अंदाजे ११% ऐवढी आहे. सदर काम दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असल्यामुळे ही भाववाढ २०% पर्यंत वाढेल असा अंदाज आहे. त्यामुळे सदर भाववाढीपोटी कंत्राटाच्या किंमतीत सरासरी १६% (अंदाजे) एवढी वाढ होणे अपेक्षीत असल्याने सदर भाववाढीपोटी अंदाजे रु.९,९६,९७,९५६/- इतका अतिरीक्त खर्च अपेक्षित आहे.

८.२ या संदर्भात चर्चा करताना कार्यकारी समितीचे सदस्य श्री.ना.वि.मिराणी यांनी सुचना केली की, जलप्रतिबंधक (water proofing) कामाची १० वर्षासाठी बँक गॅरंन्टीच्या स्वरुपात घेण्यात येणारी हमी प्राधिकरणामार्फत इमारतीचे काम पूर्ण झाल्यावर इमारतीच्या सोसायटीच्या नावे कंत्राटदाराकडून घेण्यात यावी.

..२५/-

८.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>**ठराव क्र. १२३२. :**</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप-कलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यामुळे नवीन टिळक नगर म्हाडा कॉलनी, चेंबूर येथील बाधीत १३ इमारतीमधील गाळेधारकांची पुर्नबांधणी / पुनर्वसन या कामासाठी अतिरिक्त खर्च रु.४१.२१ कोटी, कामाची सुधारीत किंमत रु.९७.९७ कोटी व कंत्राटदारास दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर काम प्राथमिक टप्प्यात असल्याने भविष्यातील अतिरिक्त बाबींसाठी सुधारीत कामाच्या किंमतीवर १०% एवढया रक्कमेपर्यंत खर्च करण्यास मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणारी पुढील योग्य ती सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>**बाब क्र.९ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ चेंबूर जोडरस्ता भाग-२ च्या कामांतर्गत रेल्वे रुळावरील पुलाच्या भागावरील स्ट्रक्चरल स्टिलच्या कामात वाढ झाल्याने उद्‌भवलेल्या अतिरिक्त खर्चास मंजूरी देणेबाबत.**</u>

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना मा. महानगर आयुक्त यांनी सांगितले की सांताक्रुझ चेंबूर जोडरस्ता भाग-२च्या कामांतर्गत रेल्वे रुळावरील पूलाच्या भागावरील स्ट्रक्चरल स्टिलच्या कामाचा खर्च रु.३७.४० कोटीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त झाल्यावर त्यास कार्यकारी समितीच्या २३३ व्या बैठकीत मंजूरी घेण्यात आली. परंतू तद्‌नंतर मध्यरेल्वेने दोन पिअर मधील अंतर व त्यासंबंधित संकल्पचित्रांमध्ये खालील प्रमाणे

बदल सुचवून त्यास मान्यता दिली :-

| अ.क्र. | पिअर क्र. | दोन पिअर मधील अंतर (मिटर) | गर्डरची खोली (मिमी) | गर्डरचे वजन (मेटरिक टन) |
|---|---|---|---|---|
| १ | पिअर क्र. ४-५ | ५०.९ | २३०० | ११९३.३० |
| २ | पिअर क्र. ५-६ | १८.३० | १८४० | २०२.४२ |
| ३ | पिअर क्र. ६-७ | ४०.५ | १८४० | ६०५.७९ |
| ४ | पिअर क्र. ३८-४०/३९-४१ (हर्बर लाईन) | ४०.५ | १८४० | ४०६.०० |
| ५ | इतर लोखंडी काम व ३% गर्डरसाठी जादाचे लोखंड धरुन | | | १२७.५२ |
| | **लोखंडी कामाचे (Structural steel) एकूण वजन** | | | २५७६.१२ |

९.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर बदल हा मुख्यतः पिअर क्र.५ चे स्थळ बदलल्यामुळे झाला. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून पाठविण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये पिअर क्र.५ याचे स्थळ हे मध्यरेल्वेच्या वाहिनी क्र. २ व ३ च्या मध्ये होते. परंतू त्यास आयुक्त, रेल्वे सुरक्षा यांनी आक्षेप घेतला व पिअर क्र. ५ चे स्थळ मध्यरेल्वेची वाहिनी क्र. ४ च्या बाहेर ठेवण्यास सांगितले व त्याप्रमाणे संकल्पचित्रास मान्यता दिली. त्यानुसार पिअर क्र. ४ व ५ यांच्यामधील अंतर ३५.४० मी. वरुन ५०.९ मी. एवढे झाले. यापुढे मध्यरेल्वेने मान्यता देतांना आणखी अतिरीक्त कामे करण्यास सांगितले व त्याची अंदाजे किंमत रु.१.२६ कोटी इतकी आहे. त्यामुळे रेल्वेने सुचविलेल्या बदलामुळे अतिरीक्त कामाची किंमत रु.१६.८० कोटी इतकी होत आहे. तसेच लोखंडी गर्डरचा प्रती मेट्रीक टन दर रु.२.०५ लक्ष हा जून, २०१० च्या दरसूची प्रमाणे मान्य करण्यात आला होता. परंतू रेल्वेकडून मान्यता येण्यास झालेल्या दिरंगाईमूळे कंत्राटदाराने सदर दरावर जून, २०१० पासून बाजार भाववाढ (Escalation) देण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता, म.रा.र.वि.मं. यांचे पत्र क्र. ३६३७ दिनांक २१ ऑगस्ट, २०१२ अन्वये प्राधिकरणास प्राप्त झाला. सदर प्रस्तावान्वये कंत्राटदारास संभावित बाजार भाववाढ (Escalation) अंदाजे रु.९.७४ कोटी एवढी देय होत आहे.

९.३ या संदर्भात चर्चा करताना कार्यकारी समितीचे सदस्य श्री.ना.वि.मिराणी यांनी सुचना केली की, लोखंडी गर्डरचा प्रती मे. टन दर रेल्वेच्या प्रचलित दरसूचीशी तपासून पहाण्यात यावा. यासंदर्भात प्राधिकरणाव्दारे असे निर्दशनास आणण्यात आले की, सदर दर हा रेल्वेच्या प्रचलित दरसूचीपेक्षा कमी असल्याचे आढळून आले.

..२७/-

९.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२३३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप-कलम (३) चे पोट-कलम (२) व (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे खालील प्रस्तावास मान्यता देत आहे :-

१) सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्या भाग-२ (कंत्राटदार :- मे.गॅमन इंडिया लि.)

अ) दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत मुदतवाढ

ब) मध्य रेल्वेने सुचविलेल्या बदलामुळे पूलाच्या रेल्वे रुळावरील लोखंडी कामाचा अतिरिक्त खर्च रु.१६.८० कोटी इतका आहे व अतिरिक्त कामाची सुधारीत किंमत रु. ५४.२१ कोटी आहे.

क) लोखंडी गर्डरच्या कामासाठी जून, २०१० च्या निर्देशांकाप्रमाणे (Base Index) बाजार भाववाढ अंदाजे रु.९.७४ कोटी आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणारी पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

## बाब क्र.१०: प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल. दिनांक ०१ सप्टेंबर, २०१२ ते दिनांक ३१ जानेवारी, २०१३.

दिनांक १ सप्टेंबर, २०१२ ते दिनांक ३१ जानेवारी, २०१३ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

———XOX———